# दिव्य जीवन



स्वामी शिवानंद सरस्वती

(दिव्य जीवन संघ, पुणे शाखा)
(ज्ञानयज्ञ म्हणून वितरित)
वर्ष ११ । अंक १०
**ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१६**



स्वामी चिदानंद सरस्वती

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा



**दिव्य जीवन परिवारातील साधकांना**
**दिपोत्सवानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा !**
**आपल्या साधनेच्या मार्गावरील प्रवासात**
**सद्गुरुंच्या कृपेची सावली सदैव असो !**

## महिन्याचा विचार

## Advice to Branches and Members of Divine Life Society

As a member of the Divine Life Society Branch, one must sincerely feel the responsibility to actively participate in and advance the working of the Branch, through whose dynamic functioning many others will be benefited and helped to the path of Divine Life. Every individual Branch-Member, therefore, must raise himself to the level of a sincere Sadhak and justify his membership by conscientious efforts to achieve the noble and worthy objects of Divine Life. The ways in which one can actively propagate the sublime mission of Sadguru Sivananda- what should practically be done in one's own walk of life, in order to set an example and to awaken the sublimity in the hearts of more men, women and children- should be constantly contemplated upon. The improvement and widening of the scope of the Branch activities by cooperative and dignified participation should be the aim of all members.

Every Branch of the Divine Life Society should be a Centre of active and selfless service. It ought to be a blessing to the people of the place where it is located; and those who are associated with the Branch should feel the joy of being servants of mankind. Every member must earnestly and humbly feel highly blessed that he has ample opportunity for spiritual SEVA. Only then will the Branch be a boon to the people and become a prime centre of service in the place.

**- Swami Chidananda**

## Swami Sivananda's Message To The Divine Life Society Members

It is a great thing, indeed, for so many of you , members of the Divine Life Society, to come under the common canopy of a broad-based spiritual idealism, an idealism which stands for self-culture, fellowship and evolution, a perspective which lifts one above the grooves of individual concerns, for the sake of meeting larger interests, for the sake of being dedicated to the values of service, mastery over lower impulses, purity of heart and mind, and aspiration for the realization of the Divine, in whatever way one is capable of aspiring in that direction.

It is a great honour for this country, where spiritual values



were developed and experimented in the past on a wide and glorious scale, that there should be such spiritual seekers as you, who today endeavour to resuscitate them. This tradition of ours is not something new, this tradition of spreading and preserving ethical and cultural principles that lend sanity to life, gracefulness to our existence.

Our forebears, who had migrated centuries ago to Malaya and Indonesia, Cambodia and Thailand, our missionaries who had gone in the past to China and Mangolia and Central Asia, not to convert the people over there to their way of life or religion, but to offer them the eternal spiritual values of existence, which had been evolved in this soil, have indeed left an indelible impression in all those countries. Today, wherever there are members of the Divine Life Society, in this country & abroad, they should wake up to their responsibility of upholding the spiritual torch through their own examples and effort.

As you all know, the teachings of the Divine Life Society do not constitute a cult or a sect or a new religion, but they bring within a unified fold the fundamental principles of all major religions & philosophies & by themselves constitute a way of life, a way of conducting oneself as best as a human being should, a way of cherishing the best values which make one's life worth living, a way of becoming an embodiment of truth, love & purity. It is not necessary to dilate upon all these, because you are already acquainted with them. But mere acquaintance with ideals will be of no use unless you have an abundant measure of the practical usefulness of these i.e., the ability to apply them in your daily life.

The relevance, as far as you are concerned, of these ideals is in proportion to the degree you are able to affect them in your conduct, in your aspiration. This is a particular point I should like to emphasize. The usefulness of the ideals is dependent on how far they are able to withstand the rigour of rational scrutiny and the test of trials and the extension of their application.

I am sure, many of you are adequately equipped to spread the message of divine life, after being well established in it, in a way that would be appealing to the largest number of people, that should not offend anybody, that should not be forced upon anybody but should inspire the people to come into its fold by virtue of its intrinsic spiritual merit, simplicity and catholicity.

God bless you all.










१. जन्मशताद्विनिमित्त सजलेले विश्वनाथ भगवान
२. नगर फेरी (२३ -९-२०१६)
३. कल्पवृक्षाचे रोपण - हस्ते परमाध्यक्ष विमलानंदजी महाराज.
४. पादूका पूजन (२४ -०९-२०१६)
५. गुरू निवास
६. गंगा आरती (२४ -०९-२०१६)












## स्वामी चिदानंद जन्मशताब्दी सोहळा

पुणे शाखेच्या संदस्यांना दि. २१ सप्टेंबरपासून ऋषिकेश येथील आश्रमात साजऱ्या होणाऱ्या जन्मशताब्दी सोहोळ्याला उपस्थित राहता आले. या निमित्ताने आयोजित केलेल्या विविध समारंभांना हजेरी लावता आली. त्यातील काही विचार-कण आणि क्षणचित्रे -

१८ ते २२ सप्टेंबर दरम्यान 'खरी अध्यात्मिक साधना' या विषयावर पाच दिवसांची आध्यात्मिक परिषद (संमेलन) आयोजित करण्यात आली होती. विविध वक्त्यांचे विचार...

**१. डॉ. अरविंद राव (सेवानिवृत्त डायरेक्टर जनरल ऑफ पुलिस)**

**विषय : उपनिषदांमधील साधना तत्त्वे**

- आध्यत्मिकता ही एक प्रक्रिया असते. जागरूकतेच्या विविध थरांमधून ती प्रकट होत असते.
- सगळी उपनिषदे 'सर्वात्मभावात' विलीन होतात.

- ॐ या एकाच अक्षरात सर्व मानवीय अनुभूती समाविष्ट झालेल्या आहेत.
- शंकराचार्यांच्या मते ओंकार उपासनेत प्रतीक आणि अनुभूती (वाच - तत्त्वमसि) अभिप्रेत आहेत.
- उपासनेतून मानवाचे उन्नयन होणे म्हणजे ऋषी पद प्राप्त होणे.
- ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन व्यक्ती नसून त्या उत्पत्ती, स्थिती आणि लय या तीन अवस्था आहेत.
- गायत्री मंत्र पठण ही प्राणोपासना असून ती सूर्याच्याही पलीकडे जाते.
- कर्म ही निष्काम सेवा असून ती चित्तशुद्धीकडे जाणारी वाट आहे.
- विश्वात आपणच असे आहोत, जे इतरांचा द्वेष करीत नाही. वैदीक परंपरेची आपल्याला ही देणगी आहे.
- भगवंतापार जाणे हेच वैश्विक सत्य आहे.
- बहिरंग साधना (पूजा, जप इत्यादी) आपल्याला अंतरंग साधनेकडे नेते आणि अंतरंग साधना (श्रवण, मनन, अभ्यास) आपणास साक्षात साधनेकडे नेते. साक्षात साधना म्हणजे ब्रह्माकार वृत्ती !
- शुद्ध मन वैराग्यप्रत नेऊ शकते. त्यातून एकाग्रता लाभली की उपासनेच्या बलाची अनुभूती होते.
- सर्वात्मभाव, मानसिक भाव ही उपासनेची फळे आहेत. (One considers oneself to be the universe)
- फलासक्ती न धरता केलेली उपासना, जीवनमुक्ती प्राप्त करून देते.

**२. प्रा. गंगाधर पांडा (संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठ, वाराणसी)**

- वेदांमध्ये तीन प्रकारचे ऋण सांगितलेले आहेत - देवऋण, ऋषीऋण आणि पितृऋण.
- ईश्वराने निर्माण केलेल्या प्राणीमात्रांना संतुष्ट करावे. ज्याच्याकडे एक कोटी रुपये असतील आणि त्याला एक लाख रुपये दिले तर तो ते स्वीकारेल आणि तरीही तो अतृप्तच असेल. मात्र ज्याचे पोट भरले असेल, तो तृप्त असेल आणि अधिकचा एकही घास खाऊ शकणार नाही.
- पंचमहायज्ञकर्म ही एक अशी संकल्पना आहे जी आपण अंमलात आणू शकतो. सनातन धर्माने आपल्या परंपरांचे आणि संस्कृतीचे जतन केलेले आहे.
- पडद्यामागील सर्वांचे आपण आभार मानायला हवे.
- न मागता, असंख्य गोष्टी आपल्याला मिळत असतात, त्याबाबत आपण सदैव ऋणी राहायला हवे.



- कृतघ्न प्रवृत्तीला कधीही क्षमा मिळू शकत नाही. शास्त्रानुसार अशा व्यक्तींसाठी कुठलेही प्रायश्चित्त असत नाही.
- पंचमहायज्ञ म्हणजेच कृतज्ञता भाव.
- आपल्या परंपरांचा सन्मान करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिकणे आणि ज्ञानाचा विनियोग करणे. हाच ब्रह्मयज्ञ आहे.
- देवयज्ञाची अशी धारणा आहे की आपण जे काही आहुतीत टाकू ते सर्व ईश्वराप्रत जाते.
- पशुपक्षी प्राणी यांना दान करणे म्हणजे भूतयज्ञ !
- श्राद्धादी कर्मे म्हणजे पितृऋण ! गृहस्थाश्रमातील व्यक्तींनी हे यज्ञ करणे अभिप्रेत असते. भारतीय संस्कृतीचा हा परीमळ आहे.

**३. प्रा. मणि शास्त्री (मद्रास संस्कृत कॉलेज)**

**विषय : गीतेतील कर्म योग**

- कर्म व कर्मयोगात फरक आहे. तसेच कर्म आणि योग या संज्ञांमध्येही फरक आहे.
- गीता हा तत्त्वज्ञानात्मक विषयांवरील ग्रंथ आहे. त्याबरोबरच कर्म आणि भक्ती या साधन रुपांनाही या ग्रंथात स्पर्श केलेला आहे.
- गीतेच्या दुसऱ्या अध्यायात बुद्धीयोगाचा उल्लेख आहे. कर्मयोगाचे फळ, कर्माच्या फळापेक्षाही श्रेष्ठतम असते. कर्मबंधातून मुक्ती मिळवण्याचे एक साधन म्हणजे कर्मयोग.
- सांख्य म्हणजे आत्मज्ञान. ते आत्म्याचे ब्रह्माबरोबर एकरुपत्व घडवू शकते.
- जो कर्मयोग करतो, तो नित्यसंन्यासी असतो. अनायसे बंधमुक्त होतो.
- गीता मूलतः ज्ञानशास्त्र आहे, पण ते कर्मयोगावर भर देते.
- गीतेमध्ये आत्म्याबाबत पूर्ण उपदेश केलेला आहे. (आत्मज्ञान शास्त्र) मात्र काय करायचे आहे याबाबत स्पष्ट निर्देश गीतेत नाही.
- कर्मयोगाविना आत्मज्ञान संभवत नाही.
- कर्तेपण हेच बंधनाचे मूळ कारण असते. 'ईश्वरार्पण' वृत्तीने कर्म करावयास हवे. कर्म शास्त्रविहित (पूजेच्या स्वरूपात) असावे.

**४. स्वामी मुनीवत्सलदास (दिल्ली अक्षरधामचे प्रमुख)**

**विषय : 'ऐशा ब्रह्म स्थिती पार्था'**

- स्थितप्रज्ञांच्या लक्षणाबाबत बोलताना स्वामीजी म्हणाले खऱ्या अर्थाने स्थितप्रज्ञ म्हणून प्रमुख स्वामी महाराजांकडे व स्वामी चिदानंद सरस्वतींकडे बोट दाखवावे लागेल.
- गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील प्रथम श्लोकापासून अर्जूनामधील बदलाचा प्रवास सुरु होतो. तो अठराव्या अध्यायातील अंतिम श्लोकापाशी येऊन थांबतो.

- हा आध्यात्मिक स्थित्यंतराचा, प्रवास गीतेमध्ये आढळून येतो. अशी जिवंत चरीत्रे आपणामध्ये बदल घडवून आणतात.
- सरलता + सहजता + स्वाभाविकता = स्थितप्रज्ञता
- तप + ज्ञान + अहंकाराचा त्याग हेच गीतेचे सार !
- स्वामी चिदानंद सरस्वती हे खऱ्या अर्थाने संतता आणि साधूता यांचे प्रतीक होते. त्यांच्यात राग, क्रोध, भय इत्यादी भावनांचा अभाव होता.
- स्थितप्रज्ञ मानतो की, संकल्प पूर्ण झाला - भगवंताचे आभार ! संकल्प अपूर्ण राहिला - भगवंताची इच्छा.

आध्यात्मिक संमेलनात रोज रात्री विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने 'साई संध्या' (श्री. संजय नागपाल) भरत नाट्यम् आणि कथ्थक नृत्याविष्कार (रजनी राजा कला क्षेत्रम्) मणिपूरी नृत्य, भजन संध्या इत्यादींचा समावेश होता. दि. २३ रोजी दुपारी २ वाजता नगर प्रदक्षिणा (गोशालेपर्यंत) व नामसंकीर्तन झाले. दि. २४ रोजी सकाळी प्रभातफेरी, पूर्णाहूति सोहळा, पादुका- पूजन व संतवृंदाचे आशिर्वचन हे कार्यक्रम पार पडले. सायंकाळी स्वयंसेवकांचे आभार मानून स्वामींजींच्या स्मृती सर्वांनी कथन केल्या. या निमित्ताने सर्वांनी गंगापूजन व आरती केली. यावेळी अवकाशात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. दि. २४ रोजी जन्मशताब्दी स्मृतीप्रीत्यर्थ अनेक हिंदी व इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. 'बर्थ डे मेसेज' या पुस्तकाच्या प्रती मोफत वितरित करण्यात आल्या व प्रसाद वाटपही झाले. अशा रीतीने एका चिरस्मरणीय सोहोळ्याची सांगता झाली. नव्याने प्रकाशित झालेली काही पुस्तके व स्मरणिका पुणे शाखेत उपलब्ध आहेत. इच्छुकांनी वाचण्यासाठी संपर्क साधावा. (टीप : पुढील अंक डिसेंबर २०१६ मध्ये प्रकाशित होईल.)

पुस्त डाक

प्रति

_______________

_______________

_______________

_______________